# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मालमत्ता कर विभाग

दि.१७/०४/२०२६

**प्रेस नोट**

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येत आहे की, सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाची मालमत्ता कर देयके वितरणाची कार्यवाही सुरू आहे. या वर्षासाठीची महत्त्वपूर्ण माहिती आणि सवलती खालीलप्रमाणे आहेत:

- सहामाही देयक बजावणी: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची 'ड' मधील नियम क्र. ३० नुसार, सन २०२६-२७ या वर्षाचे मालमत्ता कर देयक सहामाही पद्धतीने बजावण्यात आलेले आहे.
- व्हॉट्सॲप चॅटबॉट (WhatsApp Chatbot) सुविधा: नागरिकांच्या सुविधेसाठी आता मालमत्ता कराची माहिती व कर देयक ९६६५८७७७०७ या व्हॉट्सॲप क्रमांकावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. या क्रमांकावर संदेश पाठवून आपण आपले देयक सहज प्राप्त करू शकता.
- मोबाईल क्र. व ईमेल आपल्या मालमत्ता क्रमांकाशी जोडण्यासाठी लिंक : https://onlinevvcmc.in/APP/FrmMobEmailUpdLogin.aspx
- देयक उपलब्धता: ज्या मालमत्ता धारकांना प्रत्यक्ष देयक प्राप्त करून घ्यावयाचे असेल, त्यांनी महानगरपालिकेच्या https://vvcmc.in/online-property-tax/ या संकेतस्थळावर किंवा संबंधित प्रभाग समिती कार्यालयात भेट देऊन मोफत देयक प्राप्त करून घ्यावे.
- त्वरीत कर भरणा सवलत: मुदतीत मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्या नागरिकांसाठी महानगरपालिकेमार्फत विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे:

| सूटचा तपशील | |
|---|---|
| कालावधी | सूटचा दर (सामान्य करात) |
| १ एप्रिल २०२६ ते ३० जून २०२६ पर्यंत | ५% |
| १ जुलै २०२६ ते ३१ जुलै २०२६ पर्यंत | ३% |

- ऑनलाईन भरणा सुविधा: नागरिकांच्या सोयीसाठी संकेतस्थळावर देयक पाहणे, डाऊनलोड करणे आणि विविध ऑनलाईन माध्यमांद्वारे (उदा. Google Pay, PhonePe, Paytm, नेट बँकिंग) कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

तरी सर्व मालमत्ता धारकांनी आपल्या मालमत्ता कराचा भरणा मुदतीत करून वरील सवलतीचा लाभ घ्यावा आणि महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

उपायुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका